संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त : प्रणश्यति ।।

# समाजामध्ये आत्मकल्याणाचा विवेक जागवला पाहिजे

आपला भवसागर तरुन जाण्यासाठी पांडुरंगाला कृपेचा सागर अशी उपमा देऊन तुकाराम महाराजांनी जीवनाच्या सार्थकतेचे मर्म सांगितले आहे आणि तेच प्रत्यक्ष अनुभवण्यासाठी आज पंढरपुरामध्ये लाखो वारकऱ्यांची मांदियाळी भरली आहे.शेकडो वर्षांची ही परंपरा आजही तेवढ्याच उत्साहाने आणि आनंदाने पाळली जाते.यावरुनच वारी या शब्दातले सत्य तितक्याच प्रभावीपणे लक्षात येते. एकाचवेळी, एकाच दिवशी लाखो लोक एकाच ध्येयाने भारले जातात.किंवा एकत्र येतात.ही गोष्ट केवळ परंपरा म्हणून वर्णन करुन चालणार नाही.तर तो आयुष्याचे मूल्यसांगणारा फार मोठा जीवनसंस्कार आहे हे आवर्जून लक्षात घ्यावे लागेल.आजच्या भौतिक जगामध्ये आणि लौकिक आनंदासाठी अनेक प्रकारची ध्येय उद्दीष्टे ठेवली जातात.ती प्राप्त करण्यासाठी जीवनाचा अक्षरशः आटापिटा चालू असतो, परंतु ज्यावेळी यासगळ्या सृष्टीचा परब्रह्माचा आपण विचार करतो त्यावेळेला सत्य आणि नित्य या दोन्ही गोष्टी किती अनिवार्य आहेत हे ध्यानात येते.आणि म्हणून अक्षरशः लाखो लोकांच्या साक्षीने चंद्रभागेच्या तीरावर ओसंडून वाहणारा हा भक्तीसागर म्हणजे आनंदाने मिरवावा असा जीवनसंस्कार ठरतो. आजच्या ज्ञानविज्ञानयुगामध्ये या गोष्टींची अनिवार्यता शिकल्या सवरल्या लोकांच्याही लक्षात येऊ लागली आहे.केवळ पोटार्थी बनून आयुष्य घालवण्यापेक्षा ज्ञानार्थी बनून आत्मकल्याणाचा मार्ग अवलंबावा अशा ध्येयाने वारीचा मार्ग लोक धरत असतात.आणि रामकृष्ण हरीचा जप करीत आपल्या वैखरीलाही शुचिर्भूत करीत असतात.संतांच्या शिकवणीतून सन्मार्गाची कास धरणाऱ्या वारकऱ्यांचा हा मेळा म्हणजे सज्जनांच्या संगतीमध्ये केले जाणारे परमेश्वराचे चिंतन असते.कारण जीव जन्माला येतो, परंतु अहंकाराच्या विकृतीमुळे तो आयुष्याच्या सुकृतालाही पारखा होण्याची भीती असते.ती टळावी आणि खऱ्या अर्थाने परब्रह्माचे अस्तित्व प्रत्यक्ष प्रमाणाने सिध्द करता येत नसतानाही केवळ त्या अधिष्ठानावर आपल्या भक्तीला सोपवण्याचे काम वारकरी जेव्हा करतात त्यावेळेला खऱ्या अर्थाने ज्ञानाला तत्त्वाचे रुप प्राप्त होते.

**परब्रह्माच्या गाठीभेटी**

ज्ञानोबा तुकारामांच्या नामघोषामध्ये आणि भगव्या पताकांच्या दिंड्या इतक्या आनंदाने मिरवत जाणारा हा वारकरी अनेकवेळेला टीकेचेही कारण ठरतो.तो निरक्षर आहे.त्याच्याकडे वेळ भरपूर आहे.इथपासून ते त्याला टाळकुट्या म्हणण्यापर्यंत अनेक अहंकारी लोकांची मजल जाते.परंतु निराकार,निर्गुण परब्रह्म समजून घ्यायचा असेल तर वारीच्या गर्दीमध्ये स्वतःचे अस्तित्व विसरून निर्गुण भक्तीचा अनुभव घेता आला पाहिजे.ही गोष्ट केवळ एखाददुसऱ्या वारीमध्ये सहभागी झाल्यामुळे घडू शकत नाही त्यासाठी अक्षरशः पिढ्यानंपिढ्या तपश्चर्या करावी लागते.वर्षानुवर्षे वारीमध्ये सहभागी होऊन त्या परब्रह्माचा अनुभव घ्यावा लागतो.ज्यांनी केवळ वारी पाहिली आहे तेच तिच्यावर टीका करण्याचा प्रयत्न करतात.आणि ज्यांनी वारी अनुभवली आहे त्यांना या टीकाकारांच्या अज्ञानीपणाची अक्षरशः कीव येते. वारीमध्ये सुरू असणारा हरिनाचा गजर आणि टाळमृदुंगाच्या नादावर सर्व काही विसरणारा तो भक्त आपल्या मुळ उद्दिष्टापासून तो विभक्त झालेला नाही याचेच प्रत्यंतर येते. करावी वारी जाणावा हरि। इथेसुध्दा जाणावा या शब्दामध्ये ज्ञानेश्वर माऊलींनी म्हटल्याप्रमाणे अतींद्रिय होऊन जाणिवेची एक वेगळी पातळी अपेक्षित असते. आणि म्हणून वर्षानुवर्षे वारीचा हा प्रपंच करून परमार्थाची वाट चोखाळण्याचा अट्टाहास पहायला मिळतो.ही भक्ती पाहूनच आषाढी एकादशीला हे परब्रह्म प्रत्यक्ष भक्तांच्या भेटीला येते.ज्याला जीवलग असा शब्द वापरला गेला आहे.जे पांडुरंगाचे जीवलग असतील ज्यांनी खऱ्या अर्थाने आपल्या जीवनामधून प्रपंचापेक्षाही परमार्थातील वर्म ओळखले असेल त्यांना या जीवलग शब्दातले महत्त्व लक्षात येईल.आषाढीला होणारी गर्दी ही काही त्या एका दिवसापुरतीच घडणारी गोष्ट नसते.तर वारीतली ही सगळी शिदोरी पूर्ण जीवनासाठी उपयोगी पडेल इतका परमार्थ त्यामध्ये पाठवलेला असतो.

**भक्ती किंवा अध्यात्ममार्गाची मांडणी**

आजही महाराष्ट्रातल्या अनेक घरांमध्ये हरिपाठाचे ज्ञानेश्वरीचे,तुकोबारायांच्या गाथेचे किंवा अनेक संत महंतांच्या अभंगांचे अक्षरशः पारायण होत असते. कारण अशा प्रकारच्या सदभावांची निर्मिती हीसुध्दा एका पूर्वपुण्याईचा भाग असतो.म्हणूनच माऊलींनी त्याला

**बहुता सुकृतांची जोडी। म्हणोनी विठ्ले आवडी।**
**सर्व सुखाचे आगर।बाप रखुमादेवीवर।।**

असे सांगून जीवनाच्या प्रवासामध्ये या पध्दतीच्या सुकृताचे संचित किती मोलाचे आहे हेच सांगण्याचा प्रयत्न केला आहे.खरे तर हे संतांनी अनुभवले आणि प्रत्यक्ष सांगितलेदेखील.मात्र अजूनही समाजामधला हा परमार्थ विवेक पूर्णपणे अंगिकारला गेलेला नाही. आणि म्हणून आजच्या शिकल्या सवरलेल्यांच्या जगातही विकृतींचे विळखे जागोजागी पहायला मिळतात.एकमेकांवरचा अविश्वास भ्रष्टाचार,गैरव्यवहार अशा अनेक प्रवृत्ती पहायला मिळतात.त्यावरचा एकमेव उपाय जर कोणता असेल तर तो म्हणजे समाजामध्ये आत्मकल्याणाचा विवेक जागवला पाहिजे.तो केवळ लौकिक शिक्षणातून होणार नाही.तर भक्ती किंवा अध्यात्माच्या पारलौकिक विवेचनातून लवकर होण्याची शक्यता आहे.याला समजावून सांगण्याचे काम समाजातल्या उच्चविद्याविभूषितांनी पुढाकार घेऊन केले पाहिजे.ज्यावेळेला समाजातला भाव काहीतरी चांगले घडावे अशा प्रवृत्तीचा असतो. त्यावेळेला अन्य गोष्टींचा किंवा प्रदुषित गोष्टींचा प्रादुर्भाव होणार नाही याची काळजी घ्यावी लागते. आज वारीची वर्णने लोकांपर्यंत दाखवली गेली.परंतु ज्ञानेश्वरी किंवा गाथेतल्या विवेचनाचा हा तात्विक आविष्कार आहे अशी वारीची मांडणीच झालेली नाही.ती करण्याचे दायित्व स्वीकारावे लागेल.आणि अध्यात्माचा भक्तीचा मार्ग अधिक प्रकाशमय करावा लागेल.